**तहसिल कार्यालय उत्तर सोलापूर**
क्र.२०१७/जमा-१/प्र.क्र.४६/एलएनए.एसआर-७/कावि/२७२/१७,
दिनांक ०६/०४/२०१७.

**परिशिष्ट-"ब"**

**महाराष्ट्र जमीन महसुल संहिता,१९६६ च्या कलम ४२-अ, मधील तरतुदींन्वये नियोजन प्राधिकरणाने बांधकाम/विकास परवानगी दिली आहे, अशा जमिनीच्या भोगवटदारास द्यावयाच्या सनदेचा नमूना**

ज्याअर्थी, जिल्हा सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर, गांव **देगांव** च्या सर्व्हे क्र./गट क्र./ न.भू.क्र. **१०५/१ चे क्षेत्र १३३०० चौ.मी. ग.नं. १०५/२ चे क्षेत्र १८००० चौ.मी. ग.नं. १०५/३ चे क्षेत्र ८१०० चौ.मी. ग.नं. १०५/४ चे क्षेत्र ८२०० चौ.मी., १०५/५ चे क्षेत्र १७४०० चौ.मी., १०५/६ चे क्षेत्र १३९०० चौ.मी., १०६/१/अ चे क्षेत्र २०६०० चौ.मी., १०६/१/ब चे क्षेत्र १७४०० चौ.मी., १०६/१/क चे क्षेत्र १५६०० चौ.मी., १०६/१ड चे क्षेत्र १९१०० चौ.मी.** या जमिनीच्या भोगवटदाराने महाराष्ट्र जमीन महसुल संहिता, १९६६ च्या कलम ४२-अ च्या तरतुदींन्वये रहिवास या अकृषिक प्रयोजनासाठी सदर जमिनीचा विकास करण्यास **मा.आयुक्त, सोलापूर महानगरपालिका सोलापूर** या नियोजन प्राधिकरणाच्या आदेश **क्र.ससंनर/नर/अकृषिक परवानगी/२०१७/४३९८ दि.३१/०३/२०१७** अन्वये विकास/ बांधकाम परवानगी प्राप्त केली आहे, ज्या संबधी नियोजन प्राधिकरणाने मंजूर केलेला नकाशा या सनदेसोबत संलग्न आहे.

ज्याअर्थी उक्त जमिनीच्या भोगवटदाराने शासनाला, उक्त संहितेच्या कलम ४७-अ नुसार देय रुपांतरण कराची व वर नमुद अकृषित प्रयोजनार्थ वापरापोटी आकारणीची रक्कम दिनांक **०३/०४/२०१७** रोजी भरणा केली आहे.

त्याअर्थी आता उक्त संहितेमधील तरतुदीच्या आणि तद्न्वये करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदींना आणि खालील शर्तींना अधिन राहुन उपरोक्त जमीनीच्या भोगवटदारास सदर नियोजन प्राधिकाऱ्याच्या वर उल्लेखीत विकास/बांधकाम परवानगीच्या अनुषंगाने सदर जमिनीवर अनुज्ञेय करण्यात आलेल्या अकृषित वापरासाठी उक्त संहितेच्या कलम ४२-अ अन्वये ही सनद देण्यात येत आहे.

१) आकारणी : उक्त जमिनीचा भोगवटदार उक्त जमिनीच्या संबंधात या अगोदर वसुली योग्य असलेल्या आकारणी ऐवजी वर उल्लेखीत विकास/ बांधकाम परवानगी प्राप्त झाल्यापासून दिनांक **३१ जुलै २०१७** (वर्ष) रोजी संपणाऱ्या हमीच्या कालावधीत शासनाला प्रत्येक वर्षी **रु.०.६१/- प्रति चौ.मी. (अक्षरी शुन्य रुपये एकसष्ट पैसे फक्त)** या दराने परिगणित होणारी वार्षिक आकारणी देय आणि उक्त कालावधी संपल्यानंतर, उक्त संहिते अन्वये जिल्हाधिकाऱ्यांकडून, वेळोवेळी निश्चित करण्यात येईल, अशी सुधारित आकारणी देईल.

२) उक्त जमिनीचा भोगवटदार उक्त जमिनीवर वसुली ये ाग्य असलेले सर्व कर, दर आणि उपकर भरील.

३) वरीलप्रमाणे मंजूर केलेल्या वापरामध्ये किंवा वापराच्या क्षेत्रामध्ये नियोजन प्राधिकरणाच्या पुर्व मंजूरीशिवाय कोणताही बदल करु नये व हि सनद निर्गमीत झाल्यानंतर नियोजन प्राधिकरणाच्या पुर्व मान्यतेने सदर जमिनीच्या वापरामध्ये किंवा वापराच्या क्षेत्रामध्ये कोणताही बदल झाल्यास त्याची माहिती, असा बदल नियोजन प्राधिकारणांकडून मंजूर झाल्यापासून ३० दिवसांच्या आत जिल्हाधिकारी यांना देणे भोगवटदारावर बंधनकारक आहे.

४) उक्त जमिनीच्या भोगवटदाराने पुर्वगामी शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे उल्लंघन केल्यास जिल्हाधिकाऱ्यास, उक्त संहितेच्या आणि तद्न्वये करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदी अन्वये फी भरण्यास उपयोगकर्ता दायी असे.

अशी  इतर कोणत्याही शास्तीस बाधा न आणता त्यास योग्य वाटेल अशी आकारणी भरल्यावर आणि कलम ३२९ च्या पोट कलम  (२) च्या अधिनतेने, त्यास योग्य वाटेल तेंवढा दंड भरल्यास उक्त जमिन भोगवटदार याच्या वहिवाटीस असण्याचे चालु ठेवता येईल.

त्याची साक्ष म्हणून सोलापूर जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यानी/ जिल्हाधिकाऱ्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने याठिकाणी महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या वतीने स्वाक्षरी केलेली आहे, आणि त्यांच्या पदाची मोहर लावली आहे आणि अर्जदाराने सुद्धा दिनांक ०६/०४/२०१७ रोजी त्याची स्वाक्षरी येथे केलेली आहे.

भोगवटदाराची स्वाक्षरी

(हणमंत कोळेकर)
**तहसिलदार उत्तर सोलापूर**

आम्ही जाहीर करतो की, ज्याने या सनदेवर स्वत: **कु.मु. रणजित कांतीलाल शहा म्हणून** स्वाक्षरी केलेली आहे ती **रणजित कांतीलाल शहा** ही व्यक्ति, तीच व्यक्ती आहे आणि त्याने याठिकाणी आमच्या समक्ष त्याची स्वाक्षरी केलेली आहे.

( अनिल श्री कुलकर्णी )

( राजू प्रभाकर )

प्रत :- **१.सौ. शांताबाई सदानंद गायकवाड व इतर तीन,** कृती कन्स्ट्रक्शन, सोलापूर

**२.गांव कामगार तलाठी देगांव व मंडळ अधिकारी तिऱ्हे यांचेकडे**

२/- सदर सनदेची नोंद गांव नमूना नं.२ यास घेऊन अकृषिक सारा आकारणी करुन त्याची वसुली करावी. तसेच ओपन स्पेस व रस्ते यांचे क्षेत्राचे दोन ७/१२ उतारे स्थानिक प्राधिकरणाचे नावे नोंद करणे. मुळ ७/१२ बंद करणे व प्लॉट एवढे नवीन ७/१२ मूळ मालकाचे नावे उघडणेत येऊन तसा अहवाल देणेकरीता ॲमिनिटी स्पेसचा ७/१२ सुध्दा मुळ मालकाच्या नावे करणेकरीता.

**३.उपअधिक्षक, भूमी अभिलेख, उत्तर सोलापूर** यांचेकडे जरुर त्या कार्यवाहीसाठी रवाना.

**४.मा.मुद्रांक जिल्हाधिकारी तथा सहजिल्हा निबंधक वर्ग-१ सोलापूर** यांचेकडे माहितीसाठी.

**५.मा.सहा. संचालक, नगररचना सोलापूर महानगरपालिका सोलापूर** यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

(हणमंत कोळेकर)
**तहसिलदार उत्तर सोलापूर**